




दैनिक
महाराष्ट्राचा बुलंद आवाज
● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■








●बीड(महाराष्ट्र) ●वर्ष ५ वे ●अंक १६२ ●गुरूवार, दि. ११ सप्टेंबर २०२५ ●RNI-MAHMAR/2021/80074 ●Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 ●पान १ ●पाने ४ ●किंमत ३ रूपये

● dailymarathwadapatra2021@gmail.com ● https://marathwadapatra.com ● https://epaper.marathwadapatra.com ● Mo. 9822152955




# मला तू आवडत नाही, तुझ्यासोबत...

# नवऱ्याच्या एका वाक्याने सोनालीचा घात

**बीड । प्रतिनिधी**

आपण २१ व्या शतकात जगत असताना आजही गावाखेड्यात हुंड्यासाठी महिलांचा छळ होणे, त्यांचा बळी जाण्याच्या घटना समाजात सुरुच आहेत. बीडमध्ये घडलेल्या एका दुर्दैवी घटनेने हे सिद्ध झाले आहे. बीड जिल्ह्यातील गेवराई तालुक्यात एका नवविवाहितेचा मृतदेह तिच्या सासरच्या घराजवळील विहिरीत संशयास्पद स्थितीत आढळला आहे. सोनाली वनवे असे या म हिलेचे नाव आहे. तिच्या लग्नाला केवळ दोन महिने झाले होते. मात्र पती आणि सासरच्यांनी केलेल्या छळाला कंटाळून तिने आपले जीवन संपवल्या आरोप तिच्या कुटुंबीयांनी केला आहे.

**बीड जिल्ह्यातील गेवराई तालुक्यात दोन महिन्यापूर्वी लग्न झालेल्या सोनाली वनवे या तरुणीचा मृतदेह संशयास्पद परिस्थितीत विहिरीत आढळला. तिच्या कुटुंबियांनी सासरच्यांनी केलेल्या हुंड्याच्या छळामुळे तिने आत्महत्या केल्याचा आरोप केला आहे.**

बीड जिल्ह्यातील गेवराई तालुक्यातील राजुरी मळा या ठिकाणी राहणाऱ्या सोनाली बाळू वनवे (२०) हिचा विवाह दोन महिन्यांपूर्वी जंबुरा वस्ती येथील अनिकेत गर्जे याच्याशी झाला होता. लग्नाचे सनई-चौघडे वाजले. दोन्हीही घरात आनंदाचं वातावरण पसरलं होतं. सोनालीला नवऱ्याचं घर, नवीन माणसं, नवीन स्वप्नं सारे काही आनंदी वाटत होते. पण लग्नानंतर महिना उलटत नाही तोच तिच्या आनंदाला ग्रहण लागलं. अवघ्या एका महिन्यातच तिच्या सासरच्या मंडळींनी खरे रंग दाखवण्यास सुरुवात केली.

▶▶ उर्वरित पान २ वर

# बीडमध्ये आणखी एका सरपंचाचा मृत्यू; टिप्परच्या धडकेत जळगव्हाणच्या सरपंचाचा नातीसह मृत्यू, अपघात की घातपात ?

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्याच्या परळी तालुक्यातील पांगरी येथील हायवेवर टिप्पर आणि बुलेटचा भीषण अपघात झाला. या अपघातात दोघांचा जागीच मृत्यू झाल्याचे समोर आले आहे. तर एक जण गंभीर जखमी झाला आहे. घटनेची माहिती मिळताच परळी येथील ग्रामिण पोलीस ठाण्याचे पोलीस घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी जखमी झालेल्या व्यक्तीस अंबाजोगाई येथील ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. यश कंपनीच्या टिप्परने बुलेटला जोरदार धडक दिली. त्यानंतर हा अपघात झाला असल्याचे सांगण्यात येत आहे. हा अपघात जुन्या पांगरी गावामध्ये नागरगोजे यांच्या आखाड्यासमोर घडला आहे. या अपघातात जळगव्हाणचे सरपंच याचा जागीच मृत्यू झाल्याचे समोर आले आहे. जळगव्हाणचे सरपंच वसंत ताराचंद चव्हाण (वय ५५) असे त्यांचे नाव आहे. जळगव्हाणचे सरपंच वसंत ताराचंद चव्हाण (वय ५५) आणि




▶▶ उर्वरित पान २ वर

# गेवराईचा बंगला माझ्या नावावर पाहिजे नाही तर...

# नर्तकीची बीडच्या माजी उपसरपंचाला धमकी आणि थेट गाडीतच

**बीड । प्रतिनिधी**

बीडमधील गेवराई तालुक्यातील लुखामसाला गावात शोककळा पसलीये. गावचे माजी उपसरपंच गोविंद बर्गे यांनी वयाच्या अवघ्या ३४ व्या वर्षी जीवनयात्रा संपवली. मात्र, त्यांच्या आत्महत्येनंतर धक्कादायक खुलासे होताना दिसत आहेत. कुटुंबियांनी थेट पोलिसात धाव घेतलीये. गोविंद बर्गे यांना कला केंद्रात जाण्याची सवय होती आणि त्यामुळेच त्यांना टोकाचे पाऊस उचलत थेट स्वत:वर गोळ्या झाडत आयुष्य संपवावे लागले. थापडीतांडा कला केंद्रात जात असताना गोविंद यांची भेट ही पूजा गायकवाड हिच्यासोबत झाली. पूजा दिसण्यास सुंदर आणि अवघ्या २१ वर्षाची. गोविंद पूजासाठी दररोजच कला केंद्रात जात. गोविंदचा प्लॉटिंगचा व्यवसाय होता आणि त्यामधून तो चांगला



▶▶ उर्वरित पान २ वर

# सरपंच संतोष देशमुख हत्येप्रकरणात अजित पवार गटाचा हस्तक्षेप? धनंजय देशमुखांच्या वक्तव्याने खळबळ

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरण महाराष्ट्राच्या राजकारणात लक्षवेधी ठरला आहे. या खटल्यातील आरोपींची ओळख, त्यांचं राजकीय पाठबळ आणि खटल्याभोवती सुरू असलेले आरोप-प्रत्यारोप यामुळे प्रत्येक सुनावणी महत्त्वाची ठरत आहे. सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर संपूर्ण जिल्हा हादरला होता. या प्रकरणातील मुख्य आरोपी वाल्मिक कराडचं नाव पुढे आलं आणि तेव्हापासून हा खटला राज्यभर गाजतो आहे. त्यातच या खटल्याच्या सुनावणीनंतर सरपंच संतोष देशमुख यांचे बंधु धनंजय देशमुख यांनी खळबळजनक वक्तव्य केलं आहे. सरपंच संतोष देशमुख हत्येप्रकरणात अजित पवार गटाचा हस्तक्षेप वाढत असल्याचे धनंजय देशमुख यांनी प्रतिक्रिया देताना म्हटलं आहे. त्यामुळे कर्तव्यदक्ष महिला आयपीएस अधिकारीला दमदाटी करणारे अजित पवार पुन्हा एकदा चर्चेत आले आहेत.




नेमकं काय म्हणाले धनंजय देशमुख ?- बीड जिल्हा कोर्टात सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणातील आरोपींच्या दोष मुक्तीच्या अर्जावर सुनावणी झाली. सुनावरणीनंतर धनंजय देशमुख यांनी

▶▶ उर्वरित पान २ वर

# पाटोदा तालुक्यात प्रश्न अनेक, सामाजिक कार्यकर्त्यांचे इरादेही नेक ; मात्र सर्वसामान्य जनताच फेक असल्याने लढायचं कुणासाठी ?

**पाटोदा । प्रतिनिधी**

पाटोदा तालुक्यात असंख्य प्रश्न आहेत. त्यामध्ये पिण्याच्या पाण्याची टंचाई, रस्त्यांची दयनीय अवस्था, शेतकऱ्यांचे हाल, बेरोजगारी, आरोग्याची बिकट परिस्थिती पण सर्वसामान्य जनता म ात्र गप्प बसलेली आहे. आश्चर्याची गोष्ट म्हणजे ज्या जनतेला या प्रश्नांचा रोज सामना करावा लागतो, तीच जनता बोलायला किंवा उभे राहायला तयार नाही सामाजिक कार्यकर्ते आणि विरोधी पक्षाचे नेते प्रश्नांसाठी सतत आवाज उठवत शासन- प्रशासनाला धडक देत आहे. पण जनतेचा पाठिंबा कुठे आहे ? गावोगावी लोक फक्त चर्चा करतात, पण कृतीत मात्र शून्य! भीतीपोटी किंवा स्वार्थापोटी जनता



मौन बाळगते आणि निवडणुकांच्या वेळी पुन्हा त्याच लोकांना निवडून देते, ज्यांच्या काळात हे प्रश्न निर्माण झाले. मग प्रश्न उपस्थित होतो लढायचं कुणासाठी? जे स्वत:च्या हक्कासाठीही उभं राहात नाहीत, त्यांच्यासाठी कार्यकर्त्यांनी किती लढायचं ?पाटोद्यात प्रश्नांचे डोंगर आहेत, कार्यकर्त्यांचे इरादे प्रामाणिक आहेत, पण जनता जर अशीच निष्क्रिय राहिली, तर पाटोदा तालुक्याच्या विकासाला आणखी किती वर्षे अन्याय सहन करत गप्प बसावे लागेल, हा असा मोठा प्रश्न आहे!

# बीड जिल्ह्यात मराठा आरक्षणासाठी ग्रामस्तरावर काटेकोर चौकशी होणार

## शासनाच्या २ सप्टेंबरचा निर्णयानुसार ग्राम समित्या स्थापन

**बीड । प्रतिनिधी**

मराठा आरक्षणाच्या मागणीला गती देण्यासाठी शासनाने काढलेल्या २ सप्टेंबर २०२५ च्या निर्णयानुसार बीड जिल्ह्यात ग्रामस्तरावर काटेकोर चौकशी सुरू होणार आहे . जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या मार्गदर्शनाखाली तालुका व ग्रामपंचायत स्तरावर गठीत समित्या कामकाज करणार आहेत. प्रत्येक गावात गठीत होणाऱ्या समितीत ग्राममहसूल अधिकारी , ग्रामपंचायत अधिकारी आणि सहाय्यक कृषी अधिकारी यांचा समावेश असेल . या समित्या



अर्जदार व त्यांच्या कुटुंबीयांची माहिती गोळा करून प्राथमिक चौकशी अहवाल तयार करणार आहेत. बीड जिल्ह्यात आलेल्या अर्जांची संख्या दिवसेंदिवस वाढत असून, या अर्जांची तपासणी पुढील टप्प्यांनुसार केली जाणार आहे:

▶▶ उर्वरित पान २ वर

# जनसुरक्षा विधेयक कायदा म्हणजे सामान्य माणसाचा आवाज दाबण्याचे काम: आ. संदीप क्षीरसागर

## जनसुरक्षा विधेयकाच्या विरोधात महाविकास आघाडी गप्प बसणार नाही: राजेंद्र मस्के

**बीड । प्रतिनिधी**

जनसुरक्षा कायद्याच्या विरोधामध्ये आज महाराष्ट्रभर महाविकास आघाडीच्या वतीने जिल्ह्याच्या ठिकाणी धरणे आंदोलनाच्या माध्यमातून विरोध करण्यात आला बीडमध्ये छत्रपती शिवाजी महाराज पुतळा समोरील चौकामध्ये हे आंदोलन करण्यात आले. आज १० सप्टेंबर २०२५ रोजी राज्यभर निर्धार आंदोलन बीड जिल्हा पातळीवर निदर्शने



जनसुरक्षा विधेयक २०२४ - लोकशाहीस धोका महाराष्ट्र विधीमंडळात पाशवी बहुमताच्या जोरावर महाराष्ट्र जनसुरक्षा विधेयक २०२४ मंजूर करण्यात आले. सरकारने नक्षलवादाचा बहाणा करून हा कायदा आणला असला, तरी या कायद्यामध्ये नक्षलवाद हाच शब्द नाही.प्रत्यक्षात हा कायदा सरकारला विरोध करणाऱ्या, सरकारच्या धोरणांवर टीका करणाऱ्या आणि शांततामय मार्गाने आंदोलन करणाऱ्या नागरिकांवर गदा आणण्यासाठी तयार केला गेला आहे. लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रातील नागरिक, कार्यकर्ते, विचारवंत, पत्रकार, विद्यार्थी यांनी

▶▶ उर्वरित पान २ वर

# मराठा आरक्षणासाठी महत्त्वाची घडामोड! आजपासून 8 जिल्ह्यांमध्ये सुरु झाले कुणबी जातीचे प्रमाणपत्र वाटप, समाजात आनंदाची लाट

**छ. संभाजीनगर । प्रतिनिधी**

मनोज जरांगे पाटील यांच्या लढल्याला अखेर यश मिळाले आहे. २ सप्टेंबर रोजी देवेंद्र फडणवीस सरकारने मराठा आरक्षणासाठी हैदराबाद गॅझेटियरचा जीआर काढला होता. त्यानंतर आता कुणबी प्रमाणपत्र देण्याच्या प्रक्रियेला सुरूवात झाली आहे. मनोज जरांगे पाटील यांच्याकडून दोन दिवसांपूर्वी कुणी प्रमाणपत्र वाटपाला सुरूवात करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली होती. त्यानुसार, आता सरकारकडून मराठवाड्यात



कुणबी प्रमाणपत्र देण्यास सुरूवात करण्यात आली आहे.

हैदराबाद गॅझेटिअरनुसार मराठवाड्यातील कुणबी प्रमाणपत्र वाटप करण्यासाठीच्या प्रक्रियेला सुरुवात झाली आहे. हैद्राबाद गॅझेटिअर मधील नोंदी विचारात घेऊन गावपातळीवर गठीत समि तीमधील सदस्यांसाठी प्रशिक्षण सत्र व कार्यशाळा आयोजित करण्याच्या मराठवाड्यातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांना सूचना देण्यात आल्या आहेत. त्याबाबतचे पत्र समोर आले आहे. विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर, जिल्हाधिकाऱ्याकडून तसं पत्र पाठवण्यात आले आहे.

छत्रपती संभाजीनगर, जालना, धाराशीव, लातूर, हिंगोली, बीड, नांदेड आणि परभणी जिल्ह्याला राज्य सरकारच्या सामान्य प्रशासन विभागाकडून पत्र पाठवण्यात आले आहे.

▶▶ उर्वरित पान २ वर

# मराठवाड्यातील बंजारा समाजालाही हैद्राबाद गॅझेटियर लागू करा : मुळूक



## छ.संभाजीनगर येथे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना दिले निवेदन

**बीड । प्रतिनिधी**

मराठवाड्यातील बंजारा सम ाजालाही हैद्राबाद गॅझेटियर लागू करून अनुसूचित जमातीचा दर्जा देण्याची पहिली मागणी शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी शिवसेनेचे मुख्य नेते तथा राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे केली आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे बुधवारी छत्रपती संभाजीनगर दौऱ्यावर असताना मुळूक यांनी त्यांची भेट घेऊन निवेदन दिले. १९२० च्या हैद्राबाद गॅझेटियरमध्ये बंजारा समाजाचा अनुसूचित जमाती म्हणून स्पष्ट उल्लेख असून, हा समाज ऐतिहासिक आणि प्रशासकीय दृष्टिकोनातून आदिवासी समाजात गणला जातो ही बाब मुळूक यांनी उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या निदर्शनास आणून दिली. मराठवाडा प्रदेश सन १९४८ पर्यंत निजाम शाशित हैद्राबाद राज्याचा भाग होता. त्या काळातील हैद्राबाद गॅझेटियर सन १९२० मध्ये लांबडा / बंजारा (सुगळी) समाजाचा अनुसूचित जमाती म्हणून स्पष्ट उल्लेख करण्यात आला आहे. गॅझेटमधील उतारा असे आहे. लांबडा म्हणजे ज्यांना बंजारा किंवा सुगळी असेही म्हणतात. हा एक मोठा

▶▶ उर्वरित पान २ वर




# नेपाळ आज भारताचा भाग असता, पण नेहरूंनी एक प्रस्ताव फेटाळला अन्...

गेल्या दोन दिवसांत नेपाळमध्ये झालेल्या हिंसक आंदोलनानंतर पंतप्रधान ओली यांनी त्यांच्या पदाचा राजीनामा दिला आहे. त्यामुळे नेपाळमधील सरकार कोसळलं असून तिथे राजकीय अस्थिरता निर्माण झाली आहे.

या घटनेनंतर भारत सरकारनेही निवदेन जारी करत नेपाळमधील भारतीयांना परत येण्याचं आवाहन केलं आहे. महत्त्वाचे म्हणजे त्यानंतर भारत नेपाळ यांच्यातील संबंधांबाबतही चर्चा सुरु झाली आहे. नेहरूंनी जर नेपाळच्या तत्कालीन राजाचा प्रस्ताव स्विकारला असता, तर नेपाळ आज भारताचा भाग राहिला असता, असा दावाही केला जातो आहे. माजी राष्ट्रपती प्रणव मुखर्जी आणि माजी पंतप्रधान चंद्रशेखर यांनी त्यांच्या त्यांच्या आत्मचरित्रात याचा उल्लेख केला आहे. पंतप्रधान चंद्रशेखर यांच्या आत्मचरित्रातील केलेल्या उल्लेखानुसार, जनता पक्ष




सरकारच्या काळात चौधरी चरण सिंह आणि बी. पी. कोइराला यांच्या भेटीत हा विषय समोर आला होता. तेव्हा चंद्रशेखर देखील उपस्थित होते. चरण सिंह यांनी कोइराला यांना सांगितले की, नेपाळचे राजा त्रिभुवन यांनी नेहरू यांना नेपाळ भारतात विलीन करण्याची विनंती केली होती. पण या वक्तव्याने कोइराला अस्वस्थ झाले होते. त्यावेळी वातावरण निवळण्यासाठी चंद्रशेखर यांनी विषय बदलण्याचा प्रयत्न केला होता.

चंद्रशेखर यांनी आपल्या 'जीवन जैसा जिया' या आत्मचरित्रात हा प्रसंग सविस्तर लिहिला आहे. ते म्हणतात, की एकदा बी.पी. कोइराला दिल्लीत आले होते. त्यांनी पंतप्रधान मोरारजी देसाई यांची भेट घेण्याची इच्छा व्यक्त केली होती. मी त्यांना दुसऱ्या दिवशी भेटण्याचे ठरवलं होतं. तेव्हा चौधरी चरण सिंह यांनी मला सांगितले की, त्यांना कोइराला यांच्याशी बोलायचे आहे. त्यामुळे मी त्यांना दुपारच्या जेवणासाठी बोलावले. पुढे त्यांनी सांगितलं की, यावेळी चरण सिंह यांनी नेपाळच्या परिस्थितीचा अंदाज न घेता कोइराला यांना इतिहास सांगायला सुरुवात केली होती. त्यांनी सांगितले की, नेपाळचे राजा त्रिभुवन यांनी नेहरू यांना नेपाळ भारतात विलीन करण्याची विनंती केली होती. नेहरूंनी जर हा प्रस्ताव मान्य केला असता, तर आज ही समस्या उद्भवली नसती. यावेळी कोइराला यांचा चेहरा पूर्णपणे उतरला होता माजी राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांनी त्यांच्या 'द प्रेसिडेंशियल इयर्स' आत्मचरित्रात याचा उल्लेख केला आहे. ते म्हणाले, की नेपाळचे राजा वीर विक्रम त्रिभुवन शाह यांनी नेहरू यांच्यासमोर नेपाळचे भारतात विलीनीकरणाचा प्रस्ताव मांडला होता, परंतु नेहरूंनी तो नाकारला. मुखर्जी यांनी पुढे असेही लिहिले की, जर हा प्रस्ताव इंदिरा गांधी यांच्यासमोर आला असता, तर नेपाळ सिक्किमप्रमाणे भारताचा एक प्रांत झाला असता.

◆ पान १ वरून पुढे...

## मला तू...

सोनालीच्या सासरच्या मंडळींनी तिच्या माहेरच्या लोकांकडे ५ लाख रुपयांच्या हुंड्याची मागणी केली. सोनालीच्या माहेरच्या लोकांनी मोठ्या कष्टाने हे पैसे दिले. पण त्यांची पैशांची भूक काही कमी झाली नाही. ते सोनालीचा वारंवार छळ करु लागले. हुंड्याचे पैसे मिळाल्यानंतरही तिचा पती अनिकेत गर्जे 'मला तू आवडत नाहीस' आणि 'मला तुझ्यासोबत राहायचे नाही' असे बोलून सतत मानसिक त्रास देत होता. सासू प्रतिभा गर्जे आणि सासरे एकनाथ गर्जे हे देखील यात सहभागी होते. वारंवार होणाऱ्या या त्रासाला कंटाळून सोनालीने आपल्या आईला आणि माहेरच्यांना याची माहिती दिली. पण याचा काहीही उपयोग झाला नाही. त्यांनी सोनालीला समजावले, धीर दिला. पण तरीही तिचा छळ सुरुच होता. यानंतर ३१ ऑगस्ट रोजी सोनाली अचानक बेपत्ता झाली. तिचा कुटुंबियांनी तिचा शोध घेतला असता, तिच्या सासरच्या घराजवळील विहिरीत तिचा मृतदेह आढळून आला. या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. मृतदेहाचा पंचनामा करताना पोलिसांना सोनालीच्या शरीरावर अनेक ठिकाणी जखमा आढळल्या. यामुळे हा केवळ आत्महत्येचा प्रकार नसून छळाला कंटाळून तिला जीवन संपवण्यासाठी प्रवृत्त केल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. एका नव्या आयुष्याच्या सुरुवातीलाच क्रूर हुंड्याच्या बळी ठरलेल्या सोनालीच्या प्रकरणात पोलिसांनी तिच्या पतीसह सासरच्या मंडळींविरोधात गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा तपास सुरू असला तरी पुन्हा एकदा हुंडाबळी प्रकरण चर्चेत आले आहे.

## बीडमध्ये आणखी....

त्यांची नात श्रुती विजय चव्हाण (वय ८ वर्षे) यांचा जागीच मृत्यू झाला आहे. वसंत चव्हाण यांची पत्नी कस्तुराबाई वसंत चव्हाण या गंभीर जखमी झाल्या आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, श्रुतीची तब्येत ठिक नव्हती. त्यामुळे तिला उपचारासाठी परळी येथील खासगी रुग्णालयात आणण्यात आले होते. श्रुतीवर दुपारी उपचार करण्यात आले. हे उपचार झाल्यावर गावाकडे जाताना सायंकाळी अपघात घडला असल्याचे सांगण्यात येत आहे. या भीषण अपघातात सरपंच वसंत चव्हाण यांच्यासोबत त्यांची नात पण मयत झाल्याचं वृत्त समोर येत आहे. घटनेचा पंचनामा सुरू असून नेमका अपघात झाला की घातपात झाला या बाबतही स्थानिक पोलीस तपास करत आहेत.

## गेवराईचा बंगला....

पैसा कमावत. शिवाय तो राजकारणातही सक्रिय होता. कला केंद्रातील नर्तकी पूजा गायकवाड हिच्या प्रेमात हळूहळू गोविंद पूर्णपणे बुडाला. तो हे देखील विसरून गेला की, त्याची एक मुलगा आणि मुलगा आहे. त्याने पूजा गायकवाडला महागडा फोन आणि कित्येक सोन्याचे दागिने प्रेमात दिले. मात्र, पूजाची नजर पडली ती म्हणजे गोविंद याच्या गेवराई येथील टोलेजंग बंगल्यावरआणि तेथूनच खरा वाद सुरू झाला. पूजाने गोविंदच्या मागे गेवराईतील त्याचा आलिशान बंगला आपल्या नावावर करण्यासाठी तगादा लावला. गोविंदच्या गेवराईतील त्या बंगल्यात त्याचे कुटुंब राहत. फक्त गेवराई येथील बंगलाच नाही तर पूजाने तिच्या भावाच्या नावावर गोविंदच्या नावावर असलेली पाच एकर जमीन करण्यासाठीही सांगितले. मात्र, गोविंद पूजाचे म्हणणे ऐकत नव्हता. शेवटी पूजाने गोविंदसोबत बोलणे पूर्णपणे बंद केले. गोविंद पूजाला सतत फोन करत होता आणि तिला भेटण्यासाठी प्रयत्न करत राहिला. शेवटी गोविंद हा पूजाच्या बार्शीतील सासुरेगावात पोहोचला. तिथे दोघांची भेट झाली. मात्र, पूजा आपल्या

◆ पान १ वरून पुढे...

गेवराईच्या बंगल्याच्या अटीवर ठाम होती. हेच नाही तर तिने थेट धमकी गोविंदला दिली की, तो बंगला माझ्या नावावर करनाही तर मी तुझ्यावर बलात्काराचा गुन्हा दाखल करेल. पूजाच्या घरातून गोविंद रात्री निघाला. मात्र, त्याने पूजाच्या घरापासून काही अंतरावरच स्वत:वर बंदूकीतून गोळी झाडली आणि आयुष्याचा शेवट केला. गोविंदच्या आत्महत्येनंतर एकच खळबळ उडाल्याचे सध्या बघायला मिळतंय.

## सरपंच संतोष...

पत्रकारांशी संवाद साधला. धनंजय देशमुख यांनी सामाजिक सलोखा आणि आरोपींविषयी रोकठोक मत व्यक्त केले आहे. देशमुख म्हणाले, एकीकडे लोकप्रतिनिधींकडून सामाजिक सलोखा बिघडल्याचे खोटे आरोप केले जात आहेत, परंतु आरोपींच्या समर्थक टोळ्यांवर कोणतीही कारवाई होत नाही. आरोपींच्या समर्थनार्थ अजित पवार गटातील पदाधिकाऱ्यांनीही भूमिका घेतली आहे, तरी त्यांच्यावरही कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही. ज्यांनी सामाजिक सलोखा बिघडल्याचे आरोप लावले आहेत, त्यांनी घोषणाबाजीवर कधीही प्रतिक्रिया दिली नाही, असेही देशमुखांनी यावेळी स्पष्ट केले. एकीकडे निषेध करणे आणि दुसरीकडे आरोपींचे समर्थन करणे हे विरोधाभास असल्याचे धनंजय देशमुख यांनी म्हटलं आहे.

न्यायदेवतेवर पूर्ण विश्वास– न्यायालय आणि विशेष तपास यंत्रनेवर आपला पूर्ण विश्वास असल्याचे धनंजय देशमुखांनी सांगितले आहे . आरोपींना शिक्षा नक्कीच होईल, याबाबत आमचा विश्वास आहे. मात्र, समाजविघातक कृत्य करणाऱ्या आरोपींची लोकप्रियता कमी करणे, ही गरज असल्याचे यावेळी देशमुखांनी सांगितले. अजित पवारांचे समर्थक सुनावणीसाठी येतात– धनंजय देशमुखांनी महादेव मुंडे खुन प्रकरणावरही भाष्य केलं आहे. ते म्हणाले, या प्रकरणाचा तपास एसआयटी करत आहे. अजित पवारांच्या पक्षातील पदाधिकारी आरोपींच्या हेरिंगसाठी येत आहेत. मात्र, अजित पवार यांनी या बाबतीत योग्य दखल घेतलेली नाही, असा आरोपही देशमखांनी यावेळी केला.

आरोपीचा फोटो बॅनरवर लावणे हे चुकीचं– सर्व जाती–धर्मांच्या सण उत्सवांना सध्या जोरदार सुरू आहेत. मात्र, एखाद्या आरोपीचा फोटो बॅनरवर लावणे हे चुकीचे आहे. त्यांनी जिल्हाधिकारी यांना या प्रकरणी कारवाई करावी, अशी अपेक्षा व्यक्त केली होती. मात्र, कारवाई झाली नाही. आता आपण स्वतः याप्रकरणी जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेऊन चर्चा करणार असल्याचे धनंजय देशमुख यांनी सांगितले आहे.

उज्ज्वल निकम यांचा आक्रमक पवित्रा– दरम्यान, सरकारी वकील उज्ज्वल निकम यांचा आक्रमक पवित्रा घेतला आहे. उज्ज्वल निकम म्हणाले, आरोपींना खटला लांबवून काहीतरी वेगळं साध्य करायचंय. पण आता कोर्ट नेमकी काय भूमिका घेणार हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे. आता सगळ्यांच्या नजरा आहेत त्या १९ सप्टेंबर आणि २४ सप्टेंबर या दोन तारखांकडे. १९ तारखेला हायकोर्टात वाल्मिक कराडच्या दोषमुक्तीच्या अर्जावर सुनावणी होणार आहे. तर २४ सप्टेंबरला बीडच्या विशेष मकोका न्यायालयात पुन्हा संतोष देशमुख प्रकरणाची सुनावणी होईल.

## बीड जिल्ह्यात ...

जिल्ह्यातील शाळांमध्ये अर्जदार , त्यांचे वडील वा आजोबा यांच्या प्रवेशनोंदी व दाखल्यांची पडताळणी होईल . विशेषत : १३ ऑक्टोबर १९६७ पूर्वीचे दाखले समित्यांसाठी महत्वाचे ठरणार आहेत . महसूल नोंदी , गाव नमुना ७/१२ , घरपट्टी नोंदी व जन्म – मृत्यू दाखले यांच्या आधारे कुटुंबाची वंशावळ सिद्ध केली जाणार आहे . प्रत्येक गावात ज्येष्ठ नागरिक , शेजारी , ग्रामपंचायत सदस्य , पोलीस पाटील यांचे जबाब प्रतिज्ञापत्राद्वारे

◆ पान १ वरून पुढे...

घेतले जाणार आहेत . ग्रामस्तरीय अहवाल पूर्ण झाल्यानंतर तो तालुका समितीकडे पाठवला जाणार असून , तालुका समिती आवश्यक असल्यास अर्जदाराला प्रत्यक्ष चौकशीसाठी बोलावणार आहे. जिल्हा प्रशासनाने संबंधित अधिकाऱ्यांना स्पष्ट सूचना दिल्या आहेत की , अहवाल सविस्तर , पारदर्शक व पुराव्यांसह तयार करावा . जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी तालुका अधिकाऱ्यांशी विशेष बैठक घेऊन या प्रक्रियेत कोणतीही ढिलाई होऊ नये , असे निर्देश देणार असल्याचे सांगण्यात आले आहे . बीड जिल्ह्यातील अनेक गावांमध्ये नागरिक समित्यांसमोर हजर राहून प्रतिज्ञापत्र देण्यास तयार आहेत . मराठा समाजातील तरुण मोठ्या अपेक्षेने ही प्रक्रिया सुरू होण्याची वाट पाहत आहेत . ही चौकशी खरी पारदर्शक झाली , तर मराठा आरक्षणाचा प्रश्न सुटेल , असे मत स्थानिक नागरिक व्यक्त करत आहेत . मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या उपोषणामुळे राज्यभरात मराठा आरक्षणाचा मुद्दा तीव्र झाला आहे . शासनाने याआधी २५ जानेवारी २०२४ रोजीही तत्सम निर्णय घेतला होता . मात्र प्रत्यक्ष अंमलबजावणीतील त्रुटींमुळे तो प्रभावी ठरला नाही . त्यामुळे यावेळी ग्रामस्तरावरूनच कागदपत्रांची पडताळणी करण्याचा निर्णय घेतल्याने समाजामध्ये आशा निर्माण झाली आहे . बीड जिल्ह्यात ग्रामस्तरीय समित्यांची चौकशी प्रक्रिया तात्काळ सुरू होणार आहे . स्थानिक स्तरावरच कागदपत्रे , साक्षी व वंशावळ तपासली जाणार असल्याने या प्रक्रियेतील पारदर्शकता वाढेल , अशी अपेक्षा आहे . यामुळे मराठा आरक्षणाच्या मागणीला ठोस कायदेशीर आधार मिळू शकेल , असा विश्वास नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे . कुणबी, मराठा–कुणबी, आणि कुणबी–मराठा जात प्रमाणपत्र यापूर्वी बीड तालुक्यात वितरीत करण्यात आली आहेत . हैदराबाद गॅझेटिअर संदर्भातील शासन निर्णयानुसार कुणबी–मराठा जात प्रमाणपत्र देण्यासाठीची कार्यपद्धती निश्चित झाली आहे. त्यानुसार पारदर्शकपणे जात प्रमाणपत्र वितरीत केली जातील.

## जनसुरक्षा विधेयक...

भाजप–महायुतीच्या विरोधात व संविधान रक्षणासाठी ठाम भूमिका घेतली. त्यांना धडा शिकवण्यासाठी हा कायदा आहे, हे मुख्यमंत्र्यांच्या विधानातून उघड झाले आहे. नागरिकांच्या हक्कांवर घाला या कायद्यामुळे :सरकारी धोरणांवर टीका करणेही गुन्हा ठरेल. शांततामय आंदोलन – मोर्चा, उपोषण, धरणे, सत्याग्रह, संप हे बेकायदेशीर घोषित होतील. सरकारने न मानलेले पत्रके, पोस्टर, सोशल मीडियावरील संदेश गुन्हा मानला जाईल. पोलिसांना घरात घुसून तपास, जप्ती करण्याचे अमर्याद अधिकार दिले जातील.एखादी संघटना बेकायदेशीर ठरली की तिची मालमत्ता, निधी जप्त केला जाईल.फक्त संघटनेचा सदस्य असणे, वर्गणी देणे, मदत करणे यासाठीही २ ते ७ वर्ष तुरुंगवास व लाखोंचा दंड होऊ शकतो.

जनतेचा तीव्र विरोध हा कायदा मंजूर करण्यापूर्वी संयुक्त समितीने नागरिकांकडून हरकती मागवल्या होत्या.१३,००० हरकती दाखल झाल्या.त्यापैकी ९,५०० हरकतींनी विधेयक रद्द करा, अशी मागणी केली.यापूर्वी कोणत्याही विधेयकावर इतक्या मोठ्या प्रमाणावर कधीच हरकती नोंदविल्या गेल्या नव्हत्या.तरीही सरकारने या हरकतींकडे दुर्लक्ष करून कायदा पुढे रेटला. विद्यमान कायदे पुरेसे होते नक्षलवाद, दहशतवाद, हिंसा थांबवण्यासाठी आधीच UP, MCOC व भारतीय दंडसंहितेतील कठोर तरतुदी अस्तित्वात आहेत.मग नवीन कायदा कशासाठी ?

फक्त नागरिकांचा आवाज दाबण्यासाठी, विरोधी संघटनांना बेकायदेशीर ठरवण्यासाठी आणि लोकशाहीची मुस्कटदाबी करण्यासाठी.कोणता धोका निर्माण होईल..? शेतकरी, कामगार, महिला, विद्यार्थी, पर्यावरण रक्षक, भ्रष्टाचाराविरोधात लढणारे सर्वजण या कायद्याच्या फेऱ्यात येतील.रायगड,

◆ पान १ वरून पुढे...

गडचिरोली, मुंबईसह राज्यभरातील प्रकल्पांविरोधात बोलणे बेकायदेशीर ठरेल. भाषिक, सांस्कृतिक प्रश्नांवर आवाज उठवणेही गुन्हा ठरेल.एकदा संघटना बेकायदेशीर घोषित झाली की तिचे सर्व सदस्य तुरुंगात जाऊ शकतात.थोडक्यात हा कायदा जनसुरक्षेसाठी नाही तर सत्ताधाऱ्यांच्या सत्तासुरक्षेसाठी आहे. आमच्या मागण्या१.जनसुरक्षा विधेयक २०२४ त्वरित रद्द करावे.२. संविधानिक व लोकशाही अधिकारांचा सन्मान राखावा.३. शांततामय आंदोलन व सरकारवरील टीकेवर निर्बंध त्वरित थांबवावेत.आवाज दाबणाऱ्या कायद्याला ठाम विरोध करुया ! लोकशाही वाचवा – संविधान वाचवा! यावेळी बीड जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आले. यावेळी आमदार संदीप क्षीरसागर, माजी आमदार सय्यद सलीम भाई, माजी आमदार अँड उषाताई दराडे, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के, शिवसेना उबाटा गटाचे जिल्हाप्रमुख गणेश वरेकर, उल्हास गिराम, परमेश्वर सातपुते, काँग्रेसचे गणेश बजगुडे, गणेश राऊत,अँड हेमा पिंपळे, संजय महाद्वार, कम्युनिस्ट पक्षाचे भाऊराव प्रभाळे, शेतकरी कामगार पक्षाचे मोहन गुंड, गणेश जवकर, खुर्शिद आलम, बाळासाहेब गोरे,गोरख सिंघन, के के वडमारे, वैजनाथ तांदळे, हांगे दादा, रतन गुजर, बाळासाहेब राऊत, शामराव तुपे, अजित काशीद, बद्रीनाथ जटळ, सह महाविकास आघाडीचे जिल्हा पदाधिकारी, प्रदेश पदाधिकारी, तालुका पदाधिकारी, आजी माजी जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य,सरपंच उपसरपंच, नगरसेवक सह आदी उपस्थित होते.

## मराठा आरक्षणासाठी...

हैद्राबाद गॅझेटिअर मधील नोंदी विचारात घेऊन मराठा समाजाच्या व्यक्तींना कुणबी, मराठा–कुणबी किंवा कुणबी–मराठा जातीचे जात प्रमाणपत्र मिळण्यासाठी चौकशी करून सक्षम प्राधिकाऱ्यास सहाय्य करण्याच्या दृष्टीने अहवाल देण्यासाठी गावपातळीवर समिती गठीत केली आहे. अनुषंगाने समितीचे कामकाज तात्काळ सुरू करण्यासाठी मंत्रीमंडळ उपसमितीच्या बैठकीत झालेल्या चर्चेनुसार समितीमधील सदस्यांसाठी (समिती सदस्य ग्राम महसूल अधिकारी, ग्रामपंचायत अधिकारी, सहायक कृषी अधिकारी) प्रशिक्षण सत्र व कार्यशाळा आयोजित करण्यात यावी, अशा सूचना देण्यात आल्या आहेत. कूव्रशीरलरव ऋर्ग्शीिश ीशलेीवी षी चरीरींहर

## मराठवाड्यातील बंजारा...

भटकंती करणारा समाज आहे, जे हैद्राबाद राज्यात विशेषतः बेअर आणि मराठवाडा प्रदेशाच्या सीमांजवळ मोठ्या संख्येने आढळतात. वेगळ्या हिंदू जातीनुसार स्वतंत्र जमातीचा दर्जा त्यांना गृहीत धरला गेला आहे असे नमूद आहे. मराठवाडा सन १९५६ नंतर महाराष्ट्रात सामील झाल्यानंतर बंजारा समाजाला ओबीसी/एनटीसी प्रवर्गात समाविष्ट केले गेले, परंतु तेलंगणा आणि आंध्र प्रदेशात त्याच गॅझेटियरच्या आधारे त्यांना अनुसूचित जमातीचा दर्जा मिळाला आहे. संघर्ष योध्दा मनोज जरांगे यांच्या आंदोलनानंतर शासनाने मराठा समाजाला हैद्राबाद गॅझेटियर लागू केला आहे. या धर्तीवर तसेच ऐतिहासिक आणि प्रशासकीय दस्तऐवजांच्या आधारे मराठवाड्यातील बंजारा समाजालाही अनुसूचित जमाती प्रवर्गात समाविष्ट करून त्यांना आरक्षणाचा लाभ देण्याची योग्य कार्यवाही करावी, सामाजिक न्याय व समावेशाच्या दृष्टिकोनातून या मागणीला लवकरात लवकर सकारात्मक प्रतिसाद मिळावा अशी मागणी शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी केली आहे. यावेळी महिला आघाडीच्या संगीता चव्हाण उपस्थित होत्या. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी हे निवेदन गांभीर्याने स्वीकारले असून, शासन स्तरावर या मुद्द्यावर योग्य कार्यवाही करण्याचा आश्वासन दिला आहे.

◆ पान ४ वरून पुढे...

## दुष्काळग्रस्त बीडसाठी....

प्रवास व दैनंदिन सोयीसुविधा सुधारतील. ई–वाहन चार्जिंग हब बीड जिल्हा ई–वाहन वापरासाठी पुढारलेला ठरेल. या प्रकल्पांमुळे बीड जिल्ह्याचा सर्वांगीण विकास होण्यासाठी मदत होईल आणि जनतेच्या जीवनमानात मोठा फरक पडेल, असा विश्वासही खा.बजरंग सोनवणे यांनी व्यक्त केला आहे. दरम्यान, खा.सोनवणे हे सर्वांगिन विकासासाठी प्रयत्न करत असून केंद्रीय मंत्र्यांकडे ते बीड जिल्ह्यातील विविध प्रश्न सातत्याने मांडत आहेत. खा.सोनवणे यांनी अनेक मंत्र्यांच्या भेटी घेवून बीड जिल्ह्यातील नागरिकांच्या हिताचे निर्णय घेण्यासाठी पाठपुरावा सुरूच ठेवलेला आहे.

## जलशुद्धीकरण प्रकल्पाच्या...

अखंडित पाणी पुरवठा होणार असून बीड शहरातील नागरिकांचा पाण्याचा प्रश्न सुटणार आहे. आ.संदीप क्षीरसागर यांनी बीड शहराला सुरळीत पाणीपुरवठा व्हावा यासाठी ईट येथील जलशुद्धीकरण प्रकल्पावर भेट देऊन दुरुस्तीचे कामे तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश दिले होते. बीड शहरासाठी नवीन पाणीपुरवठा योजना प्रस्तावित असून, त्यासाठी माजलगाव धरणातून पाणी आणण्याचा विचार देखील केला जात आहे.

## गेवराईत इंडिया...

३ लाखाच्या आरटीजीएस करण्यासाठी बँकेत गेले होते. फॉर्म भरून दिला तरीही आरटीजीएस झाले नाही. त्यामुळे भालेराव आज दिनांक १० रोजी पुन्हा बँकेत गेले. आधी काऊंटरवर चौकशी केली आणि आरटीजीएस पास झाले नाही म्हणून त्यांनी इंडिया बँकेचे मॅनेजर यांच्या कॅबिनमध्ये जावून त्यांना या विषयी अतिशय नम्रपणे विचारणा केली. त्यावर तुम्ही डायरेक्ट माझ्याकडे कसे आलात, तुम्ही पंतप्रधानांकडे जाणार आहात का? असे सांगून अरेरावी भाषा वापरली. मॅनेजर हे बँकेचे प्रमुख असतात. अडचण आल्यास ग्राहक त्यांच्याकडे जाणारच मात्र इंडिया बँकेच्या मॅनेजरला ग्राहकांशी बोलण्याची ॲलर्जी असल्याचे दिसून आले.

## माजलगाव ग्रामीण....

असे कार्य करून अनेक कोरोना रुग्णांचे जीव वाचवण्यात त्यांचा सिंहाचा वाटा होता. त्यानंतर साबळे यांची बीड जिल्हा शल्य चिकित्सक म्हणून नियुक्ती झाली होती त्या काळात त्यांनी उत्कृष्ट असे कार्य करून एक वेगळी शिस्त जिल्हा रुग्णालयात लावली होती त्यामुळे आजही त्यांचे जिल्हा भरात उत्कृष्ट प्रशासक म्हणून नाव आहे. मात्र बीड येथेच असताना काही राजकीय व्यक्तींनी त्यांच्या कार्यात खोडा घालून त्यांची रायगड येथे बदली करण्यात

◆ पान ४ वरून पुढे...

आली होती.आता त्यांची आरोग्य विभागाचे उपसचिव दीपक केंद्रे यांनी दिनांक दहा रोजी एक आदेश काढून त्या अन्वये माजलगाव येथे डॉ साबळे यांची नियुक्ती केली आहे, त्या बद्दल सर्व थरातून अभिनंदन होत आहे.

## गाव तलाव...

ग्रामपंचायत प्रशासनास दिले असुन त्या स्मरणपत्रात पुर्विचीच मागणी करत म्हण्टले आहे की मौजे तलवाडा येथील सरकारी गायरान जमिनीमध्ये असलेल्या पाझर तलावाच्या भिंती लगटच्या बेकायदेशीरपणे असलेले अतिक्रमण प्रशासकीय अधिकारी व ग्रामसेवक हटवत नसल्याकारणाने आम्ही दिनांक १७ सप्टेंबर २०२५ मराठवाडा मुक्ती संग्रामदिनी तलवाडा गाव तलावात जलसमाधी आंदोलन करणार आहोत यांचे प्रशासनास स्मरण आसावे. आम्ही दिनांक ३०/६/२०२५ रोजी, १५/७/२०२५ रोजी, ६/८/२०२५ रोजी मा. जिल्हाधिकारी कार्यालय बीड, मा. मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब जिल्हा परिषद बीड, तहसील कार्यालय गेवराई आणि पंचायत समिती गेवराई यांना सरकारी गायरान जमिनीमधील असलेल्या पाझर तलावाच्या भिंती लगट असणारे हे बेकायदेशीर रित्या केलेले अतिक्रमण काढणे बाबत जी वारंवार निवेदने दिली होती पण आज पर्यंत कोणतीही कारवाई न केल्यामुळे आम्ही परत दिनांक १५/७/२०२५ रोजी सन्माननीय विभागीय आयुक्त सर संभाजीनगर यांना निवेदन दिले होते तरीसुद्धा अतिक्रमण काढण्यात आलेले नाही वरिष्ठ अधिकाऱ्यांचा लेखी स्वरूपातील सक्त आदेश आल्याशिवाय स्थानिक प्रशासकीय अधिकारी कोणत्याही प्रकारची कारवाई करत नाही हे अगदी स्पष्ट उघड सत्य आहे. अनाधिकृत बांधकाम स्वतः काढून घेणे बाबत गटविकास अधिकारी पंचायत समिती गेवराई यांचे पत्र क्रमांक जा.क. २६२८/ दिनांक १८/०७/२०२५ नुसार आले असता गाव तलाव संरक्षण भिंती लगटच्या सर्व अतिक्रमण धारकांना पहिली नोटीस दिनांक ११/०८/२०२५ रोजी तलवाडा ग्रामपंचायतचे प्रशासक चोपडे व ग्रामसेवक मुसळे यांनी काढली होती पण पंधरा दिवसांच्या कालावधीनंतर दुसरी नोटीस काढणे बंधनकारक असताना टाळाटाळ करण्यात आल्यामुळे मी शेख खिजर जैनोदीन व जयदेव शिंगने आम्ही दोघांनी मिळून आम्ही असा नाईलाजाने निर्णय घेतला की आम्ही दिनांक १७ सप्टेंबर रोजी मराठवाडा मुक्ती संग्रामदिनी पुन्हा तलवाडा येथील सरकारी गायरान जमिनीमध्ये असलेल्या पाझर तलावात स्थानिय प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या वेळकाढूपणामुळे जलसमाधी आंदोलन करणार आहोत. अमच्या जीवितास कोणत्याही प्रकारची पाण्यात जिवजंतूनी हानी झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी ही प्रशासनाची राहील ह्या करीता ह्या स्मरणपत्राव्दारे आम्ही आमच्या जलसमाधी आंदोलनावर ठाम आसल्याचे मनोगत प्रशासनास निवेदन दिल्यानंतर स्वाभिमानी शेतकरी

◆ पान ४ वरून पुढे...

संघटनेचे उप युवा जिल्हाध्यक्ष शेख खिजर जैनोदीन व जयदेव शिंगणे यांनी व्यक्त केले आहे.

## श्री.योगेश्वरी देवल....

पदसिध्द अध्यक्ष तहसिलदार विलास तरंगे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेतली. या बैठकीत अंबाजोगाई शहराचे आराध्य, ग्रामदैवत माता श्री.योगेश्वरी देवल कमिटीच्या उपाध्यक्षपदी अंबानगरीचे माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी तर सचिवपदी प्रा.अशोकराव लोमटे, सहसचिवपदी संजय भोसले तसेच कोषाध्यक्षपदी शिरीष पांडे यांची सर्वानुमते निवड करण्यात आल्याचे कमिटीचे अध्यक्ष तथा तहसीलदार विलास तरंगे यांनी त्यावेळी जाहीर केले होते. निवडी जाहीर केल्यानंतर सर्व पदाधिकाऱ्यांनी मी आई श्री योगेश्वरी जगदंबेची शपथ घेतो की, आम्ही श्री योगेश्वरी देवी मंदिर विश्वस्त न्यासाचा व देवी भक्तांच्या हिताचेच निर्णय घेऊ, सर्व आर्थिक व्यवहार पारदर्शी ठेवू, त्याचबरोबर मंदिराच्या सर्वांगीण विकासासाठी आम्ही आग्रही व प्रयत्नशील राहू अशी शपथ घेतली. त्यानंतर सर्व नवनिर्वाचित विश्वस्त मंडळाची पहिली बैठक होऊन त्या बैठकीत दिनांक १८/०७/२०२४ पासून मातेच्या महाआरतीनंतर दुपारी १२ ते दुपारी २ या वेळेत (अन्नछत्र) महाप्रसाद सुरू करण्याचा ऐतिहासिक असा पहिला ठराव घेण्यात आला. सदरील महाप्रसाद त्या दिवसापासून ते आजतागायत दररोज सुरू असून अंदाजे ५०० ते ६०० भक्त याचा लाभ घेतात. दुसऱ्या ठरावात मंदीराचे दैनंदिन व्यवस्थापन चांगल्या रितीने चालविण्यासाठी मंदीराचे उत्पन्न वाढविण्यासाठी सकाळी पैठणीसह देवीची प्रथम महापुजा करण्याचा निर्णय ही घेण्यात आला. यामध्ये प्रथम महापुजेस येणाऱ्या दोन व्यक्तीस रू.१०००/– ची अभिषेक करण्याची पावती घेवूनच प्रथम महापुजा करता येईल. यामध्ये पैठणी (आवश्यक) यामुळे मंदीराचे मासिक उत्पन्न रू.६२,०००/– इतके वाढले. मंदीरात होणारे देवीचे अभिषेक हे देवल कमटीस कळवून व रितसर पावती घेवूनच करावे असा ठराव ही घेण्यात आला. मंदीरात या अगोदर होणाऱ्या अभिषेक किंवा पुजेची नोंद अल्प प्रमाणात होत होती. हा ठराव मंदीरात पुजा विधी करणाऱ्या ब्राम्हणवृंदांनी देखील मोठ्या मनाने मान्य केला. यामुळे देखील मंदीराच्या मासिक उत्पन्नात रू.१५,०००/– ते २०,०००/– एवढी वाढ झाली. तसेच सर्व ब्रम्हवृंदांना अभिषेक वाटून दिले. यापुर्वी एकाच ब्राम्हण बांधवाकडून अभिषेक करून घेतले जात होते. दररोज रू.५०/– प्रति अभिषेक याप्रमाणे २५ ते ३० अभिषेक दैनंदिन होत असतात. आज मितीस देवस्थानास जवळपास नगदी रोख बँक खात्यात जमा शिल्लक, सोने–चांदीसह अंदाजे रू.१ कोटी रूपये उत्पन्न जमा आहे. यापूर्वी सकाळच्या प्रसादात दररोज फक्त खिचडी/शिरा वाटप होत होते. मात्र आमच्या विश्वस्त मंडळाने महाप्रसाद, अन्नछत्र सुरू

◆ पान ४ वरून पुढे...

केल्यामुळे दर्शनासाठी बाहेर गावांवरून येणाऱ्या भाविक व गावातील भक्तांची सोय झाली आहे. मागील अंदाजे १० ते १२ वर्षांपासून सौरऊर्जा प्रकल्प नादुरूस्त अवस्थेत पडला होता. तो दुरूस्तीसाठी ठराव घेऊन रीतसर नियमाप्रमाणे कोटेशन मागवून घेवून तो दुरूस्त करून घेण्यात आला. त्यामुळे त्याच रक्कमे मध्ये बंद पडलेल्या सोलार सिस्टीमची दुरूस्ती करून घेतली. ज्यामुळे मंदीराचे एमएसईबीचे वीज बील शुन्यापर्यंत आणण्यात आमच्या विश्वस्त मंडळाला यश आलेले होते. यामुळे मंदीराच्या मासिक खर्चात रू.२५ ते ३० हजार रूपयांची बचत होऊन तेवढ्या रकमेचे मंदिराचे उत्पन्न वाढणार आहे. आम्ही मंदीराच्या स्वच्छतेकडे नियमित लक्ष देऊन मंदीराचा कोपरा न कोपरा दररोज स्वच्छ कसा राहील यासाठी प्रामाणिक प्रयत्न केले. यामुळे आज मंदिर परिसरात दर्शनासाठी आलेला भाविक मंदीरात थोडा वेळ शांत बसून आत्मिक शांततेचा व समाधानाचा अनुभव घेत आहे. दर दोन तासाला मंदीर परिसर स्वच्छ केला जात असल्याने मंदीराचे पावित्र्य अबाधित राहत आहे. यामुळे ही मंदिराचे उत्पन्न वाढीस हातभार लागला आहे. पारदर्शक कारभारासाठी आम्ही पुढाकार घेतल्यामुळे तेव्हा सर्व कर्मचाऱ्यांनी अचानक सामुहिक राजीनामे दिले होते. कर्मचाऱ्यांनी अचानक राजीनामे दिल्यामुळे काही काळ सुधारणेची घडी विस्कटली होती. पण, लवकरच आम्ही विश्वस्तांनी स्वतः लेखा विभाग, स्वच्छता आणि विविध कामांसाठी पुढाकार घेऊन शारदीय नवरात्र उत्सव व मार्गशिर्ष उत्सव आनंदात व शांततेत साजरा केला. याचे आपण स्वतः सर्व पत्रकार मंडळी साक्षीदार आहोत. त्यानंतर आम्ही नवीन कर्मचाऱ्यांची भरती प्रक्रिया नियमानुसार राबविली. शारदीय नवरात्र उत्सवात राज्य पातळीवरील नामांकित कलावंत यांना पाचारण करून उत्सवाला मोठे व व्यापक स्वरूप दिले. नवरात्र दर्शन पासच्या माध्यमातून मंदिराला ६ लाख रूपये प्राप्त झाले. मागील ५० वर्षांपासून चालत असलेल्या कमिटीनेच २०२३ पर्यंत कामकाज केलेले होते. त्यांनीच २०१६ ची पण घटना तयार केलेली होती. त्या घटनेवरच कोर्टाने आक्षेप घेऊन सदरील घटना रद्द केलेली आहे. त्यामुळे २०२४ च्या कमेटीवर मा.न्यायालयाचा किंवा पुजाऱ्यांचा कोणताही अक्षेप नाही यांची सर्व भक्तांनी नोद घ्यावी. वेळोवेळी आपणा पत्रकार मंडळींना मुलाखत देत, आमच्या विश्वस्त मंडळाच्या अल्प कार्यकाळात मंदिरात होणाऱ्या व झालेल्या तत्कालीन नविन उपक्रमांची माहिती देवून ती जनतेपर्यंत पहोचविण्यात आपल्या सर्व पत्रकार मंडळींच्या सहकार्यामुळे आम्हाला शक्य झाले होते. त्यामुळे विविध सांस्कृतिक कार्यक्रमांना प्रोत्साहन मिळाले. अशी माहिती श्री योगेश्वरी देवी विश्वस्त मंडळाचे माजी सचिव प्रा.अशोकराव लोमटे, राजपाल भोसले, सतीशराव लोमटे, अमोल लोमटे, अजित चव्हाण, राजेभाऊ लोमटे, रवी कदम आणि श्रीमती संध्या मोहिते यांनी आयोजित पत्रकार परिषदेतून दिली आहे.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed ( Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# ईद –ए–मिलादून्नबी निमित्त निघालेल्या जुलूस मधील मुस्लिम बांधवांना मिठाई देत राजकिशोर मोदी मित्र मंडळाने जोपासला हिंदू मुस्लिम एकोपा

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

मुस्लिम धर्म गुरू महंमद पैगंबर यांचा जन्मदिवस हा ईद मिलादूनबी म्हणून मुस्लिम बांधव साजरी करतात. ही ईद शुक्रवार दि ५ सप्टेंबर रोजीच झाली . मात्र त्या काळात हिंदू धर्मियांचा गणेशोत्सव सुरू होता . त्यामुळेच अंबाजोगाई शहरात मुस्लिम बांधवानी हिंदू मुस्लिम एकतेचे भावना दाखवत ईदच्या दिवशी निघणारा मुस्लिम बांधवांचा जुलूस हा बुधवार दि १० सप्टेंबर रोजी काढण्याचे मुस्लिम बांधवानी ठरवले. त्याप्रमाणे दि १० रोजी अंबाजोगाई शहरात मुस्लिम बांधवानी मोठा जुलूस (मिरवणूक) काढला होता. या जुलूसमध्ये शेकडो मुस्लिम बांधव मोठ्या उत्साहात सहभागी झाले होते.

या जुलूसमध्ये सहभागी झालेल्या सर्व मुस्लिम बांधवांचे अंबाजोगाई शहराचे माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी यांनी आपल्या सहकाऱ्यांसोबत मिठाई वाटून जोरदार स्वागत केले.



जुलूसमध्ये मिठाई देत राजकिशोर मोदी व मित्र मंडळाने हिंदू मुस्लिम एकोप्याचे दर्शन घडविले. यावेळी जुलूस मध्ये मोदी यांच्या सोबत बबन लोमटे, शहराध्यक्ष महादेव आदमाणे, धम्मा सरवदे उपाध्यक्ष सय्यद रशीद, खालेद चाऊस, डॉ राजेश इंगोले, पंडित हुलगुंडे, किशोर परदेशी, विजय रापतवार , अंकुश हेडे, सुभाष पाणकोळी,भिमसेन लोमटे, अशोक जेधे, गणेश मसने, शाकेर काझी, जावेद गवळी, सुशील वाघमारे, अकबर पठाण, खलील जाफरी, कैलास कांबळे, दत्ता सरवदे, आकाश कऱ्हाड, विशाल पोटभरे , उज्जेन बनसोडे, शेख अस्लम, रोशन लाड यांच्यासह अनेक सहकारी उपस्थित होते.

ईद–ए–मिलादुन्नबी हा सण (ईद) मुस्लिम समाजातील म हत्त्वाच्या सणांपैकी एक सण (ईद) आहे. हा सण मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येतो. या दिवशी सर्व मुस्लिम बांधव एकत्र येऊन शहरात मोठा जुलूस काढण्यात येतो. जागोजागी हिंदू मुस्लिम बांधवांच्या वतीने ठिकठिकाणी चहा पाणी, थंड, खिचडी वाटण्यात येते. राजकिशोर मोदी यांनी देखील जुलूसमधील सहभागी असलेल्या सर्व मुस्लिम बांधवांचे पुष्पहार , शाल ,व पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात येत होते. यासोबतच जुलूस मध्ये सहभागी झालेल्या मुस्लिम बांधवाना मिठाईचे वाटप करून करून त्यांना ईदच्या शुभेच्छा दिल्या. मुस्लिम बांधव देखील राजकिशोर मोदी यांना अतिशय आपुलकीने भेटताना दिसत होते. यावरून राजकिशोर मोदी मित्र मंडळाने हिंदू मुस्लिम ऐक्याचे सौदारहय तसेच एकोप्याची परंपरा कायम ठेवल्याचे बोलले जात आहे.

# शिष्यवृत्ती वितरण 'ऑटो सिस्टिम'वर होण्यासाठी प्रारूप तयार करावे : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

### 'नवीन महाविद्यालय मान्यता प्रणाली'चे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती वेळेत मिळावी, यासाठी राज्य सरकारी कर्मचाऱ्यांच्या वेतन वितरण प्रणालीप्रमाणेच शिष्यवृत्ती वितरण 'ऑटो सिस्टम'वर होण्यासाठी प्रारूप तयार करावे, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. राज्यातील अकृषी विद्यापीठांच्या क्षेत्रामध्ये महाविद्यालये सुरु करण्यासाठी स्थळबिंदू निश्चित केले जातात. या स्थळबिंदू निश्चितीची २०२४ ते २०२९ या पंचवार्षिक बृहत् आराखड्याची बैठक मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या



अध्यक्षतेखाली झाली. बैठकीत इरादा पात्र प्राप्त महाविद्यालय ७३९ होती त्यापैकी ५९३ म हाविद्यालयांना अंतिम मान्यता देण्यात आली. महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोगाची (माहेड) बैठक सह्याद्री अतिथीगृह येथे झाली. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते नवीन महाविद्यालय मान्यता प्रणालीचे उद्घाटन करण्यात आले. या https://htedu.maharashtra.gov.in/NCPS संकेतस्थळावरून इच्छुक संस्थांना ऑनलाईन अर्ज सादर करता येणार आहेत. यावेळी उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, कौशल्य विकास, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा, आमदार आशिष देशमुख, माजी खासदार सुजय विखे पाटील, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ.पी.गुप्ता, उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे अपर मुख्य सचिव बी.वेणुगोपाल रेड्डी, रुसा प्रकल्प संचालक राजेंद्र भारुड, उच्च शिक्षण संचालक डॉ.शैलेंद्र देवळाणकर, तंत्रशिक्षण विभागाचे संचालक डॉ.विनोद मोहितकर व संबंधित अधिकारी उपस्थित होते.

उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती वेळेत मि ळाली पाहिजे यासाठी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, आदिवासी विकास विभागाने आर्थिक वर्षाची तरतूद आणि वितरणाचे कालबद्ध नियोजन करून विद्यार्थ्यांना प्रत्येक वर्षाची शिष्यवृत्ती वेळेत मिळावी यासाठी राज्य सरकारच्या वेतन वितरण प्रणालीच्या धर्तीवर शिष्यवृत्ती वितरण प्रणाली विकसित करण्यासाठी प्रारुप तयार करुन मान्यतेसाठी तातडीने सादर करावे, असे निर्देश मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी दिले.

# तुलसी कॉलेज ऑफ फॅशन डिझाईनमध्ये 'फ्रेशर्स डे' जल्लोषात

## रॅम्पवॉक, पोवाडा व समूह नृत्याच्या सादरीकरणांनी प्रेक्षक मंत्रमुग्ध

**बीड । प्रतिनिधी**

देवगिरी प्रतिष्ठान संचलित तुलसी कॉलेज ऑफ फॅशन डिझाईन, बीड येथे प्रथम वर्षाच्या नवप्रवेशित विद्यार्थ्यांचा स्वागत सोहळा 'फ्रेशर्स डे' उत्साहात पार या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी देवगिरी प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष प्रा.प्रदीप रोडे होते. तर प्रमुख पाहुण्यांमध्ये समाजकल्याण कार्यालय, बीडच्या वरिष्ठ सहायक आयुक्त सौ.कविता गायकवाड, प्रसिद्ध मेकअप आर्टिस्ट सौ. सुचिता दोडके, वैद्यनाथ बँकेचे मॅनेजर मा. सुरेश काबरा तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सुनील जोंधळे उपस्थित होते.

प्रा.प्रदीप रोडे यांनी आपल्या





मार्गदर्शनात सांगितले की, काळ सतत बदलत असतो, त्या बदलत्या काळाशी जर आपण जुळवून घेतलं नाही, तर या जगात आपलं अस्तित्व टिकवणं कठीण ठरतं. म्हणूनच आजच्या परिस्थितीत केवळ पदवी मि ळवणं पुरेसं नाही तर त्यासोबत विविध कौशल्य आत्मसात करणं अत्यावश्यक आहे.आवश्यक कौशल्यं शिकून घेतली, तर तरुण वयातच आपण कमाई सुरू करून स्वावलंबी होऊ शकतो,असे सांगून विद्यार्थ्यांना प्रोत्साहित केले. यानंतर विद्यार्थ्यांनी रॅम्पवॉक, पोवाडा व समूह नृत्य अशा जोशपूर्ण कलाविष्कारांनी उपस्थित प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले. 'वेलकम फ्रेशर्स २०२५' या संकल्पनेखाली सादर झालेल्या या कार्यक्रमाने नव्या विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वृद्धिंगत करून त्यांचा उत्साह द्विगुणित केला. वरिष्ठ विद्यार्थ्यांनी नवप्रवेशितांचे मनापासून स्वागत करत स्नेहबंध अधिक दृढ केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.आश्विनी बेद्रे यांनी करून महाविद्यालयातील उपक्रमांची माहिती दिली. सूत्रसंचालन विद्यार्थिनी पल्लवी पवार हिने केले, तर आभार प्रदर्शन प्रा.विद्या अवघडे यांनी मानले. प्राध्यापकवर्ग आणि वरिष्ठ विद्यार्थ्यांच्या सहकार्याम ुळे संपूर्ण सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात यशस्वीपणे पार पडला.

# माणूस समाधानी असला की संपतो : डॉ.देशमुख ए.एम.

**बीड । प्रतिनिधी**

माणसाने सातत्याने कष्ट करावे त्याच्या समोर कोणतेतरी ध्येय असले पाहिजे.ध्येयाशिवाय मनुष्य स्वतःचा विकास करू शकत नाही. माणसाने न्युनगंड न ठेवता नाविन्यपूर्ण कल्पना करावी जर म नुष्य सातत्यपूर्ण समाधानी असला तर तो प्रगती करू शकत नाही. असे प्रतिपादन डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, उपकेंद्र धाराशिव माजी संचालक सूक्ष्मजिवशास्त्राचे ज्येष्ठ प्रा.डॉ. देशमुख ए.एम.यांनी सौ.के. एस.के.महाविद्यालयातील बी.एस्सी. प्रथम, एम.एस्सी.प्रथम वर्ष सूक्ष्मजिवशास्त्र विषयाच्या विद्यार्थ्यांच्या स्वागताच्या कार्यक्रम प्रसंगी प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते. ते पुढे म्हणाले की, भारतातील अनेक विद्यार्थी जिद्दीच्या बळावर जगाच्या विविध विद्यापीठात शिष्यवृत्तीच्या बळावर शिक्षण घेत असून ए आय बरोबरच बायोटेक्नॉलॉजी मध्ये अमर्याद प्रमाणात संशोधनाचे कार्य करीत आहे.मनात जिद्द असेल तर पैशाची आवश्यकता नाही. मोबाईलचा वापर विद्यार्थ्यांनी शिक्षणासाठी केला पाहिजे.जगात सुक्ष्म जिवशास्त्राचे महत्व खूप मोठ्या प्रमाणात वाढ असून तक्रार करणारा माणूस आयुष्यात कधीच यशस्वी होऊ शकत नाही.रासायनिक खतांचा वापर मोठ्या प्रमाणात होत असल्यामुळे अनेक प्रकारचे



आजार माणसाला होत आहेत. त्याच प्रमाणे पर्यावरणातील इंधनांचा वापर अमर्यादित वाढत असल्यामुळे पर्यावरणावरील संतुलन बिघडत आहे.त्यामुळे ढग फुटीसारखे संकट सातत्याने येत आहे.सूक्ष्मजिवशास्त्र सर्वच क्षेत्रात उपयुक्त असून बायोबिझनेस मोठया प्रमाणात वाढत आहे.माणसाच्या आजाराला जिवाणू कारणीभूत असतात. माणसाचा स्वभाव जिवाणू ठरवतात. असे विचार यावेळी व्यक्त केले.

अध्यक्षीय समारोप करताना म हाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिवानंद क्षीरसागर यांनी महाविद्यालयात सुक्ष्मजिवशास्त्र विभाग पदवी व पदव्युत्तर क्षेत्र तसेच संशोधन केंद्राच्या माध्यमातून भरपूर मोठ्या प्रमाणात विद्यार्थी घडवत असून महाविद्यालयाचे अनेक विद्यार्थी संशोधन कार्य करत आहे. महाविद्यालयातील विविध सुविधांचा वापर विद्यार्थ्यांनी केला पाहिजे असे मत व्यक्त केले.म हाविद्यालयातील सुक्ष्मजिवशास्त्र विभागातील विद्यार्थी श्रेयस सानप यांच्या नाविन्यपूर्ण उपक्रमास भारत सरकार यांनी अर्थसहाय्य केल्या बद्दल त्याचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक सुक्ष्मजिवशास्त्र विभागाचे विभाग प्रमुख डॉ.सुधाकर गुट्टे यांनी केले.

# बाजीराव पाटील विद्यालयामध्ये शिक्षक दिन मोठ्या उत्साहात साजरा

**शिरूर कासार । प्रतिनिधी**

शिरूर कासार तालुक्यातील जांब येथील स्फुर्ती शिक्षण प्रसारक मंडळाचे बाजीराव पाटील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयामध्ये शिक्षक दिनाचे औचित्य साधून विद्यालयामध्ये कार्यक्रमाचे आयोजन केले या वेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी एक दिवसीय मुख्याध्यापक विद्यार्थीनी कु.योगिता तांबारे प्रमुख पाहुणे विद्यालयाचे प्राचार्य खाडे टी व्ही हे होते .सुरज सातपुते ,रागिणी सातपुते,कृष्णा ढोबळे,भगवान वाघमारे,या विद्यार्थ्यांनी शिक्षक होऊन विद्यार्थ्यांना ज्ञानदानाचे कार्य केले माजी राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांना अभिवादन करण्यात आले. शिक्षकदिन कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी शिक्षकांविषयी असलेली निस्सीम आदर भावना विविध कार्यक्रमाद्वारे व्यक्त केली.मार्गदर्शन संस्कार विद्यार्थ्याच्या मनात पेरणार्या आपल्या गुरुजनांबदल विद्यार्थ्यांनी मनोगत



व्यक्त केली.शिक्षकाच्या योगदानामुळे विद्यार्थी जिवनातील अंधारदूर होतो व ज्ञानाचा दिप जळतो हे सत्य सर्वांनी अधोरेखीत केले.या प्रसंगी उपस्थित शिक्षकांनी शिक्षक संकल्पनेचा गाभा उलगडून सांगितला.

# शिक्षक अभियोग्यता व बुद्धीमत्ता चाचणी परीक्षेचा निकाल जाहीर

## राखीव उमेदवारांनी १५ सप्टेंबरपर्यंत माहिती देण्याचे महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेचे आवाहन

**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्यावतीने आयबीपीएस या संस्थेमार्फत शिक्षक अभियोग्यता व बुद्धीमत्ता चाचणी (TIT) परीक्षा २०२५ चे आयोजन ऑनलाईन पद्धतीने करण्यात आले होते. या परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून निकाल राखीव ठेवलेल्या ३१८७ उमेदवारांनी आपली माहिती १५ सप्टेंबर पर्यंत ु. ाीलशर्ींपिश.ळप या संकेतस्थळावर उपलब्ध करून दिलेल्या लिंकमध्ये देण्यात यावी. त्यानंतर माहिती सादर करणाऱ्या उमेदवारांच्या राखीव निकालाबाबत विचार केला जाणार नाही, याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी, असे आवाहन महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या आयुक्त अनुराधा ओक यांनी केले आहे.

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्यावतीने दिनांक २७ मे २०२५ ते ३० मे २०२५ आणि दिनांक ०२ जून २०२५ ते ०५ जून २०२५ या कालावधीत राज्यातील २६ जिल्ह्यांमध्ये एकूण ६० परीक्षा केंद्रांवर शिक्षक अभियोग्यता व बुद्धीमत्ता चाचणी परीक्षेचे आयोजन करण्यात आले होते. सदर परीक्षेस एकूण २,२८,८०८ परीक्षार्थी / उमेदवारांनी नोंदणी केली होती. त्यापैकी परीक्षेस एकूण २,११,३०८ प्रविष्ट झाले होते.

या परीक्षेचा निकाल दि. १८ ऑगस्ट २०२५ रोजी गुणयादी व गुणपत्रक (SCORE LIST SCORE CRD) महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या www.mscepune.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आला आहे. तसेच राखीव ठेवण्यात आलेल्या बी.एड. व डी. एल.एड. परीक्षेचे एकूण ६,३२० प्रविष्ट (Appear) विद्यार्थी/उम ेदवारांपैकी २७८९ विद्यार्थी/ उम ेदवारांचा निकाल दि. २५ ऑगस्ट २०२५ रोजी प्रसिध्द करण्यात आला आहे.

# तृतीयपंथीनाही समान वागणूक मिळावी यासाठी योजनांची प्रभावी अंमलबजावणी करावी : सामाजिक न्याय राज्यमंत्री माधुरी मिसाळ

**मुंबई । प्रतिनिधी**

समाजातील तृतीयपंथीयांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शिक्षण, आरोग्य आणि रोजगारात समान संधी देत योजनांची प्रभावी अंमलबजावणी व्हावी. तसेच त्यांना मोफत व उच्च शिक्षण मिळावे यासाठी उपाययोजना करण्याचे निर्दे शही सामाजिक न्याय राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी दिले. आतापर्यंत ४७८३ तृतीयपंथीयांना ओळखपत्र जारी करण्यात आले आहेत. उर्वरित ओळखपत्र



लवकरच जारी करण्यात येणार असल्याची माहितीही त्यांनी दिली. तृतीयपंथीयांच्या सर्वांगिण विकासासाठी नवीन योजना तयार करणे, धोरणांचा आढावा, स्वतंत्र कक्ष, ओळखपत्र, स्किल डेव्हलपमेंट प्रशिक्षण देण्याबाबत तसेच विभागीय व जिल्हास्तरीय समिती स्थापन करण्यासंदर्भात आढावा बैठकीचे मंत्रालयात आयोजन करण्यात आले. यावेळी आरोग्य, वैद्यकीय शिक्षण, उच्च व तंत्रशिक्षण, महसूल विभागांच्या अधिकाऱ्यांसह तृतीयपंथी संरक्षण व कल्याण महामंडळाचे प्रतिनिधी उपस्थित होते.सामाजिक न्याय राज्यमंत्री माधुरी मिसाळ म्हणाल्या की, तृतीयपंथी यांनाही समाजात समान वागणूक मिळावी.

# सौ.के.एस.के.महाविद्यालयाचा विद्यार्थिनी किरण आचार्य गृहशास्त्र विषयात सेट परीक्षा उत्तीर्ण



**बीड । प्रतिनिधी**

येथील नवगण शिक्षण संस्थेचे सौ.केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर उर्फ काकू कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयातील गृहशास्त्र विषयाची माजी विद्यार्थिनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठा मार्फत घेतल्या जाणार्या, सहाय्यक प्राध्यापक पदासाठी आवश्यक असणार्या महाराष्ट्र राज्य पात्रता परीक्षा जून २०२५, या परीक्षेत गृहशास्त्र विषयात यश संपादन केले.

या यशाबद्दल अध्यक्ष श्री.किशोर काळे, उपाध्यक्ष डॉ.भारतभूषण क्षीरसागर,संस्थेचे सचिव डॉ.योगेश भारतभूषण क्षीरसागर,सहसचिव डॉ.दीपा क्षीरसागर, पूजा भारतभूषण क्षीरसागर, डॉ.सारिका क्षीरसागर प्रशासकीय अधिकारी डॉ.सुधाकर गुट्टे, डॉ.विश्वांभर देशम ाने तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिवानंद क्षीरसागर, उपप्राचार्य डॉ.संजय पाटील देवळाणकर, पदव्युत्तर पदवी विभागाचे संचालक डॉ.खान ए.एस., कमवि उपप्राचार्य डॉ.नारायण काकडे, पर्यवेक्षक प्रा.जालिंदर कोळेकर, तसेच डॉ. व्ही.एस.फटाले, प्रा.शाम कुरे,डॉ. दादासाहेब खोगरे विभागातील सर्व कर्मचारी तसेच महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी यांनी त्यांचे अभिनंदन केले.

# जिल्हा प्रशासनाचा वृक्षलागवडीचा आणखी एक 'इव्हेंट'

## जिल्हाधिकाऱ्यांचे प्रवचन कौतुकास्पद, परंतु तुती वृक्षलागवडीबाबत भाष्य न केल्याने पर्यावरणप्रेमी निराश: डॉ. गणेश ढवळे



**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्हा प्रशासनाकडून वृक्षलागवडीचे इव्हेंट करण्याची परंपरा कायम ठेवली जात असल्याचे पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे. यापूर्वीचे जिल्हाधिकारी राधा बिनोद शर्मा यांनी बिंदुसरा नदीकिनारी १६ किलोमीटर परिसरात ५ हजार बांबू रोपांची लागवड केल्याचा इव्हेंट करून स्वतःची पाठ थोपटून घेतली होती. मात्र काही महिन्यांतच तेथे खड्डे उरले, झाडे जगवली गेली नाहीत.

आता विद्यमान जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी या परंपरेला चालना देत एकाच दिवसात तब्बल ३० लाख वृक्षलागवडीचा इव्हेंट करून इंडियन बुक ऑफ रेकॉर्ड्स मध्ये आपले नाव नोंदवून घेतले. यानिमित्ताने पालकमंत्री अजित पवार यांच्या हस्ते त्यांचा सत्कारही झाला.

जिल्हाधिका–यांचे प्रवचन, पण तुतीवर मौन...

### शासकीय कार्यालयातील वृक्षतोडीकडे दुर्लक्ष

**दरम्यान, बीडचे जिल्हाधिकारी वृक्षलागवडीबाबत पुढाकार घेत असताना जिल्हा कारागृह आणि जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातील साग वृक्षतोडीच्या प्रकरणात मात्र ते मौन बाळगून असल्याचे पर्यावरणप्रेमींचे म्हणणे आहे. वारंवार निवेदने व आंदोलने होऊनही या संदर्भात कारवाई न झाल्याने पर्यावरण कार्यकर्त्यांनी आश्चर्य व्यक्त केले आहे.**

दि. ९ रोजी वृक्षारोपण उपक्रमाचे उद्घाटन करताना जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी वृक्ष लागवडीचे महत्त्व पटवून दिले. झाडांमुळे प्रदूषण कमी होणे, उष्णता नियंत्रित राहणे, नागरिकांना शुद्ध हवा मि ळणे, जैवविविधतेला चालना मिळणे अशा विविध फायद्यांवर त्यांनी भाष्य केले. प्रत्येक नागरिकाने किमान एक तरी झाड लावून त्याचे संगोपन करण्याची जबाबदारी स्वीकारली पाहिजे असेही आवाहन केले. मात्र यावेळी तुती वृक्षलागवडीबाबत कोणतेही भाष्य झाले नाही. तुतीची पाने रेशीम किड्यांसाठी खाद्य म्हणून वापरता येतात, परंतु ही लागवड नेमकी किती वर्ष टिकवायची? ३ वर्षांनंतर ती उपटून काढण्यास परवानगी लागणार का? तुतीला खरंच वृक्षलागवडीचा दर्जा मिळतो का? असे अनेक प्रश्न अनुत्तरितच राहिल्याने पर्यावरणप्रेमींमध्ये निराशा पसरली. पर्यावरण मंत्री पंकजाताई मुंडे यांनी जिल्हाधिका–यांचा तुतीच्या झाडाने सत्कार करावा, अशी मागणी डॉ. गणेश ढवळे यांनी विनोदी शैलीत केली आहे.

दैनिक महाराष्ट्राचा बुलंद आवाज ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

● संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ● जिल्हा विशेष ● गुरुवार, दि. ११ सप्टेंबर २०२५ ● पान ४

## थोडक्यात...

### डॉ. अशोक थोरातांचे निलंबन रद्द



**बीड । प्रतिनिधी**

बीडचे जिल्हा शल्यचिकित्सक असताना राज्य शासनाने निलंबित केलेले डॉ. अशोक थोरात यांचे निलंबन अखेर शासनाने रद्द केले आहे. मात्र त्यांना बीडलाच पुनर्नियुक्ती न देता त्यांना राज्य कामगार विमा सोसायटीचे म्हणून प्रतिनियुक्ती देण्यात आली आहे. आपले निलंबन रद्द व्हावे यासाठी डॉ. अशोक थोरात यांनी न्यायालयीन लढाई सुरु केल्यानंतर शासनाने ही भूमिका घेतली आहे. बीडचे जिल्हाशल्य चिकित्सक म्हणून डॉ. अशोक थोरात यांची कारकीर्द चांगली राहिली होती. मात्र कोरोना काळातील काही गोष्टींचा ठपका ठेवत त्यांना निलंबित करण्यात आले होते. विशेष म्हणजे या प्रकरणात ११ अधिकाऱ्यांची नावे असताना केवळ डॉ. अशोक थोरात यांच्यावर कारवाई करण्यात आली होती. शासनाच्या निलंबन आदेशाला डॉ. अशोक थोरात यांनी मॅट आणि उच्च न्यायालयात आव्हान दिले होते. यावर उच्च न्यायालयाने मॅट ला कालबद्ध सुनावणीच्या निर्देश दिले होते. या सर्व पार्श्वभूमीवर आता राज्याच्या सार्वजनि आरोग्य विभागाने डॉ. अशोक थोरात यांच्या निलंबनचे आदेश रद्द केले असून त्यांना प्रतिनियुक्तीवर राज्य कामगार विमा सोसायटीचे संचालक म्हणून नियुक्ती दिली आहे.

### आष्टी येथील विमल कदम यांचे निधन



**आष्टी । प्रतिनिधी**

आष्टी शहरातील विमल रामभाऊ कदम वय ८० यांचे बुधवार दि.१० सप्टेंबर रोजी अहिल्यानगर येथील खाजगी रुग्णालयात उपचारादरम्यान त्यांचे पहाटे ४ वाजता निधन झाले त्यांच्या पार्थिवावर शेकापूर रोडवरील खंडोबा मंदिराजवळील स्मशानभूमीत सकाळी १२ वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, सुना नातवंडे असा परिवार आहे.दिलीप कदम,प्रकाश कदम यांच्या त्या मातोश्री होत्या तर पत्रकार अविनाश कदम, बाबासाहेब कदम, कैलास कदम यांच्या चुलती होत्या आणि हरि कदम, किरण कदम,पवन कदम यांच्या आजी होत्या.

### संपादक राजेंद्र होळकर यांना पत्नीशोक : सुहासिनी होळकर कालवश



**बीड । प्रतिनिधी**

अभिमान परिवाराचा आधार असलेल्या संपादक राजेंद्र होळकर यांच्या पत्नी सुहासिनी होळकर (वय ५४) यांचे उपचारा दरम्यान पुणे येथे बुधवारी सकाळी निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर पुणे येथेच अंत्यसंस्कार करण्यात आले. सुहासिनी होळकर यांच्या निधनाने अभिमान परिवाराचा मोठा आधार कोसळला आहे. अभिमानचे संपादक राजेंद्र होळकर यांच्या पत्नी सुहासिनी होळकर मागच्या काही दिवसांपासून आजारी होत्या. त्यांच्यावर पुणे येथील रूग्णालयात उपचार सुरू होते. तब्बल १ महिन्याहून अधिक काळ त्यांनी आजाराशी कडवी झुंज दिली. मात्र बुधवारी पहाटे उपचारादरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली. सुहासिनी होळकर यांनी अत्यंत जिद्दीने आणि संघर्षाने जीवन जगले होते, अभिमान परिवार मोठा करण्यात संपादक राजेंद्र होळकर यांना त्यांनी कायम खंबीरसाथ दिली होती. एक संवेदनशील व्यक्ती, कर्तव्यदक्ष गृहीणी, कर्तव्यकठोर माता अशा वेगवेगळ्या भूमिका पार पाडत त्यांनी आयुष्य जगले. मागच्या काही काळात त्या आजारी असतानाही त्यांनी जिद्द सोडली नव्हती. अभिमानच्या वाटचालीत संपादक राजेंद्र होळकर यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याची भूमिका त्या कायम घेत आल्या होत्या. बुधवारी त्यांची प्राणज्योत मालवली. बुधवारी दुपारी पुणे येथे त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

### सत्कार्यासाठी शक्तीची नव्हे मानवधर्माची आवश्यकता ; मानवजिगरा सोन्नर यांचे ९७ वेळेस रक्तदान



**बीड । प्रतिनिधी**

बीड येथील मानवजिगरा सोन्नर यांनी आजपर्यंत ९७ वेळेस रक्तदान करुन रुग्णांना रक्ताची मदत केल्यामुळे त्यांचे कौतुक करत जिल्हा रुग्णालयाच्या डॉ.मधुलिका वाघमारे, दिलीप औसरमल यांनी राज्य रक्त संक्रमण परिषदेकडून स्मृतिचिन्ह, प्रशस्तीपत्रक व गुलाबाचे झाड देवून सन्मानित केले. यावेळी सत्काराला प्रतिउत्तर देतांना मानवजिगरा सोन्नर यांनी म्हटले की, मी यापुर्वी दि.०३ ऑगस्ट २०२१ रोजी मी मरणोत्तर बॉडी ऑर्गन डोनेट करण्याचे लिखित दिले आहे. ज्यामुळे मला माणूस म्हणून समाजासाठी काही केल्याचे सुख जाणवते. खरे पाहिले तर सत्कार्यासाठी शक्तीची नव्हे मानवधर्माची आवश्यकता यांनी सांगितले. याविषयी माहिती अशी की, शहरातील मानवजिगरा सोन्नर हे गेल्या अनेक वर्षांपासून स्वईच्छेने रक्तदान करत आले आहेत. कोरोनाच्या महामारीमध्ये लोक भितीपोटी घराबाहेर पडत नव्हते त्यावेळी देखील जिवाची पर्वा न करता लोकसेवेचे व्रत म्हणून मानवजिगरा सोन्नर यांनी सतत रक्तदान करीत राहीले.

### सौ.के.एस.के.महाविद्यालयाला जलतरण स्पर्धेत दुहेरी सुवर्ण पदक

**बीड । प्रतिनिधी**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ व सरस्वती भुवन कॉमर्स कॉलेज,छ. संभाजीनगर आयोजित आंतर महाविद्यालयीन जलतरण स्पर्धेस सौ.के.एस.के.महाविद्यालयाचा खेळाडू भंडारी गजानन यानी २०० मीटर बॅकस्ट्रोक ३ मिनिटे १० सेंकद या वेळेत पूर्ण २०० मीटर पूर्ण करून सुवर्ण पदक मिळवले. तसेच ४०० मीटर फ्रीस्टाईल या जलतरण प्रकारात ६ मिनिटे १२ सेंकद या वेळेत आंतर पार करून दुसरेही सुवर्ण पदक पटकावले व यावर्षी आंतर महाविद्यालयीन जलतरण स्पर्धेत दुहेरी सुवर्ण पदक पटकावून महाविद्यालयाचा नाव लौकिक मिळवला. व अखिल भारतीय आंतर विद्यापीठ चेन्नई येथे होणार्या स्पर्धेसाठी तो डॉ.बाबासाहेंब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या संघाचे प्रतिनिधीत्व करणार आहे. खेळाडूच्या या यशाबद्दल अध्यक्ष श्री.किशोर काळे, उपाध्यक्ष डॉ.भारतभूषण क्षीरसागर,संस्थेचे सचिव डॉ.योगेश भारतभूषण क्षीरसागर,सहसचिव डॉ.दीपा क्षीरसागर, पूजा भारतभूषण क्षीरसागर, तसेच महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी,विद्यार्थी यांनी अभिनंदन केले.

# दुष्काळग्रस्त बीडसाठी विशेष निधी अन् मंजूरी द्या

## खा.बजरंग सोनवणे यांनी केंद्रीय मंत्री खट्टर यांची भेट घेवून केली मागणी



**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्हा दुष्काळग्रस्त आहे. पायाभूत सोयी-सुविधा पण कमी आहेत. यासाठी केंद्र सरकारकडून विशेष निधी आणि मंजुरी मिळावी, अशी मागणी बीडचे खा.बजरंग सोनवणे यांनी केंद्रीय ऊर्जा आणि गृहनिर्माण तथा शहरी व्यवहार मंत्री मनोहरलाल खट्टर यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे. दि.१० रोजी खा.सोनवणे यांनी मुंबई येथे मंत्री खट्टर यांची भेट घेऊन निवेदन सादर केले. बीड जिल्ह्यात विविध विकास योजना राबविणे आवश्यक आहे. त्यासाठी खा.बजरंग सोनवणे यांनी केंद्रीय मंत्री खट्टर यांना दिलल्या निवेदनात म्हटले आहे, ग्रामीण भागात नवी वीज सबस्टेशन, ट्रान्सफॉर्मर गावागावात स्थिर वीजपुरवठा व्हावा म्हणून ही गरज आहे. शेतकऱ्यांना सौर पंप (पीएम-कुसुम योजना) शेतीसाठी पाणीपुरवठा सोपा होईल. शहरी भागात स्मार्ट मीटर व भूमिगत केबल वीज चोरी थांबेल आणि सुरक्षित वितरण होईल.सौर-पवन ऊर्जेचे प्रकल्प जिल्ह्याला हरित ऊर्जा उत्पादनाचं नवं केंद्र बनवता येईल. प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) शहरातल्या गरीब व मध्यम वर्गीयांना परवडणारी घरं उपलब्ध होतील. अमृत २.० मिशन अंतर्गत पाणीपुरवठा, ड्रेनेज व स्वच्छता योजना झ्र स्वच्छ वातावरणामुळे आजारपण कमी होईल. बसस्थानक, रस्ते, उद्यानांचं आधुनिकीकरण

▶ उर्वरित पान २ वर

**सभागृहातही खा.सोनवणेंचाच आवाज**

**खा.बजरंग सोनवणे हे ग्राऊंड पातळीवरून आलेले नेतृत्व आहे. यामुळे ग्रामीण भागात काय आवश्यक आहे, याची जाणीव त्यांना आहे. विशेष म्हणजे, याच कारणाने ते दिल्लीतील सभागृहात बीडसह मराठवाड्याचे देखील प्रश्न मांडत असतात. यामुळे संसदेत महाराष्ट्रातून सर्वाकि प्रश्न मांडणारे खासदार म्हणून सोनवणे यांच्याकडे पाहिले जात आहे.**

## जलशुद्धीकरण प्रकल्पाच्या नविन जोडणीमुळे बीडकरांचा पाण्याचा प्रश्न सुटणार: आ.संदीप क्षीरसागर



**बीड । प्रतिनिधी**

शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या २२० के.व्ही. नाळवंडी या लाईनवरून ३३/११ के.व्ही. म्हाळसजवळा फिडरला जोडून ईट येथील जलशुद्धीकरण प्रकल्पाच्या विद्युत फिडरला नविन जोडणीच्या कामाचा शुभारंभ संपन्न झाला. बीड विधानसभेचे आ. संदीप क्षीरसागर यांच्या हस्ते बीड शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या ईट येथील जलशुद्धीकरण प्रकल्पाच्या विद्युत फिडरला जवळा येथील सबस्टेशन मधून विद्युत प्रवाह वाहीनीच्या नविन जोडणीच्या कामाचा शुभारंभ संपन्न झाला. सदर लाईन जोडल्यामुळे २४ तास लाईट जल शुद्धीकरण केंद्रला उपलब्ध राहणार आहे. त्यामुळे बीड शहराला

▶ उर्वरित पान २ वर

## गेवराईत इंडिया बँकेच्या मॅनेजरची ग्राहकांना अरेरावीची भाषा

**तलवाडा । प्रतिनिधी**

गेवराई येथील इंडिया बँकेच्या मॅनेजरकडून ग्राहकांना थेट अरेरावीची भाषा वापरली जात आहे. आरटीजीएस का झाले नाही? याची विचारणा करण्यासाठी गेलेल्या भालेराव नामक ग्राहकाला तुम्ही डायरेक्ट माझ्याकडे कसे आलात? तुम्हाला कुठे जायचे ते जा असे म्हणत अरेरावी केल्याचा प्रकार घडला आहे. विशेष म्हणजे बँक मॅनेजरकडून होत असलेल्या अरेरावीची व्हिडीओ देखील समोर आला असून याप्रकारामुळे संताप व्यक्त होवू लागला आहे. बँकेतील वरिष्ठ अधिकाऱ्यांना ग्राहकांना कसे बोलावे याचेच संस्कार नसतील तर सर्वसामान्यांनी जायचे तरी कुणाकडे? असा प्रश्न भालेराव यांनी उपस्थित केला आहे. गेवराई तालुक्यातील भोगलगाव येथील रहिवासी असलेले शेतकरी भालेराव हे दिनांक ९ सप्टेंबर रोजी

▶ उर्वरित पान २ वर

## माजलगाव ग्रामीण रुग्णालय वैद्यकीय अधीक्षकपदी डॉ. सूर्यकांत सावळे



**माजलगाव । प्रतिनिधी**

येथील शासकीय ग्रामीण रुग्णालयाच्या वैद्यकीय अधीक्षक म्हणून रायगड येथून डॉ. सूर्यकांत अर्जुन साबळे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. माजलगाव येथील शासकीय ग्रामीण रुग्णालयात सध्या कार्यरत असलेले वैद्यकीय अधीक्षक डॉ. मोहन कट्टे यांची कारकीर्द वादग्रस्त राहिली असून ते नेहमी गैरहजर असल्याच्या अनेक तक्रारी जनतेतून होत्या. आता त्यांची शासकीय स्तरावर बदली झाली असून त्यांचे जागी रायगड येथून डॉ सूर्यकांत साबळे यांना नियुक्ती देण्यात आली आहे. डॉ. सूर्यकांत साबळे हे यापूर्वी देखील माजलगाव येथील ग्रामीण रुग्णालयात वैद्यकीय अधिकारी ते वैद्यकीय अधीक्षक म्हणून कार्यरत होते त्यांचा कार्यकाळ येथे उत्कृष्ट राहिलेला असून त्यांच्या काळातच या रुग्णालयात एका महिन्यात साडेचारशे महिलांच्या सिजर शस्त्रक्रिया झाल्या होत्या, त्याचप्रमाणे विविध राष्ट्रीय कार्यक्रम राबवून त्यांनी माजलगाव ग्रामीण रुग्णालयाचे नाव उंचावले होते.कोरोना काळात देखील त्यांनी उत्कृष्ट

▶ उर्वरित पान २ वर

## बीड जिल्ह्यातील महसूल कर्मचारी बेमुदत संपावर



**बीड । प्रतिनिधी**

जिल्हाधिकारी यांनी तीन कर्मचाऱ्यांना निलंबित केल्यानंतर काल सामूहिक रजेवर महसूल विभागातील वर्ग तीन व चार चे कर्मचारी गेल्यानंतर आज सवारनी सकाळपासून बेमुदत लेखणी बंद संप पुकारला आहे. यामध्ये जवळपास मोठ्या संख्येने कर्मचारी सहभागी झाले आहेत. ज्या तीन कर्मचाऱ्यांना जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी निलंबित केले त्यांना कसल्याही प्रकारचं म्हणणं मांडण्याची किंवा त्यांचे म्हणणे ऐकून न घेतच त्यांच्यावर निलंबनाची कारवाई केल्याचा आरोप महसूल कर्मचाऱ्यातून होत आहे. जोपयरत त्यांचे निलंबन मागे होत नाही तोपयरत हे सर्व कर्मचारी बेमुदत संपावर ठाम आहेत.

## गाव तलाव संरक्षण भीती लगटच्या आतिक्रमण संदर्भात स्वाभिमानी संघटनेचे प्रशासनास स्मरण पत्र

### पंधरा ऑगस्ट रोजीचे स्थगित जलसमाधी आंदोलन सतरा सप्टेंबर रोजी होणार




**बीड । प्रतिनिधी**

गेवराई तालुक्यातील तलवाडा येथील गाव तलाव संरक्षण भीती लगटच्या आतिक्रमण संदर्भात स्वाभिमानी शेतकरी संघटनेने गाव तलाव फुटन्याचा धोखा लक्षात घेऊन संरक्षण भिती लगटच्या आतिक्रमण ऊठवण्या संदर्भात स्थानिक प्रशासन ते आयुक्त कार्यालया पर्यंत लोकशाही मार्गाने पंधरा आगष्ट रोजी जलसमाधी आंदोलन करणार आसल्याचे म्हणत मागणी केली होती त्यास आणुसरुन संबधित प्रशासनाने आठ दिवसात आतिक्रमण काढण्याच्या लेखी सूचना तलवाडा ग्रामपंचायतचे ग्रामसेवक मुसळे, व प्रशासक चोपडे यांना देत तिच लेखीप्रत आंदोलन कर्त्यांना देऊन तुर्तास पंधरा आगष्टचे जलसमाधी आंदोलन स्थगित करण्याची विनंती प्रशासना कडुन करण्यात आली होती. त्या लेखी आदेशाची रितसर पूर्तता न करता तलवाडा ग्रामपंचायत प्रशासनाने ऊडवा ऊडवी करत कार्यवाही करण्याचे टाळल्यामुळे स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे उप युवा जिल्हाध्यक्ष शेख खिजर जैनोदीन व जयदेव शिंगणे यांनी प्रशासनास पंधरा आगष्ट रोजीचे स्थगित केलेले जलसमाधी आंदोलन सतरा सप्टेंबर मराठवाड़ा मुक्ती संग्रामदिनी पुन्हा करण्यात येणार असल्याचे स्मरणपत्र जिल्हाधिकारी कार्यालय बीड, जिल्हा पोलीस आधिक्षक बीड, तहसीलदार गेवराई, गटविकास अधिकारी पंचायत समिती गेवराई, पोलीस स्टेशन तलवाडा व तलवाडा

▶ उर्वरित पान २ वर

## आसाराम मेहरकर सेवानिवृत्त



**नवगण राजुरी । प्रतिनिधी**

येथील गजानन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्र.शा.स. आसाराम मेहरकर हे ३९ वर्षाच्या प्रदीर्घ सेवेनंतर नियत- वयोमानानुसार दि.३१ ऑगस्ट रोजी सेवानिवृत्त झाले. आसाराम मोहनराव मेहरकर यांचे प्राथमिक शिक्षण जि. प. प्रा. शाळा चिंचोलीमाळी तर माध्यमिक शिक्षण कर्मवीर विद्यालय चिंचोलीमाळी ता.केज जिल्हा बीड येथे झाले शिक्षण पूर्ण झाल्यानंतर पाडळी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, कृषी पंडित भागूजीराव ढेकळे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय पाडळसिंगी ता. गेवराई येथे सेवक या पदावर काम केले. सन १९९३ ते २००० या काळात प्रयोगशाळा परिचर म्हणून तर २००७ पासून ३१ऑगस्ट २०२५ पर्यंत गजानन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय नवगण राजुरी येथे प्रयोगशाळा सहाय्यक म्हणून सेवा केली. ३९वर्षाच्या प्रदीर्घ सेवेनंतर नियमनुसार ३१/०८/२०२५ रोजी ते सेवानिवृत्त झाले.

# श्री.योगेश्वरी देवल कमिटीच्या माजी विश्वस्त मंडळाने केला पारदर्शक कारभार

### भाविक-भक्तांना सुविधा ; मंदिर परिसर विकास आणि जिर्णोद्धारासाठी प्रयत्न सुरू केले होते - पत्रकार परिषदेतून माजी विश्वस्तांची माहिती



**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

येथील श्री.योगेश्वरी देवल कमिटीच्या माजी विश्वस्त मंडळाने अल्पावधीतच पारदर्शक कारभारातून भाविक-भक्तांचा विश्वास संपादन केला होता. विविध उपक्रम राबवून भाविक-भक्तांची मने जिंकली होती. भाविक-भक्तांना सुविधा, मंदिर परिसर विकास आणि जिर्णोद्धारासाठी प्रयत्न ही सुरू केले होते. पण, ज्या विश्वस्तांवर लेखापरीक्षक, तहसीलदार व आयकर विभाग यांनी गंभीर आक्षेप घेतले होते. त्यांनाच पुन्हा एकदा विश्वस्त म्हणून नेमण्यात आले आहे. हे चुकीचे आहे. व ज्यांनी चांगले काम केले त्यांना मात्र वगळण्यात आले. हे धक्कादायक आहे. या आश्चर्यकारक बदलांमागे सर्वोच्च राजकीय दबाव व प्रचंड आर्थिक व्यवहार करून. नविन विश्वस्त मंडळ नेमले आहे. अशी श्री.योगेश्वरी देवीच्या भाविक- भक्तांमध्ये चर्चा होत असल्याची माहिती माजी विश्वस्तांनी आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेतून दिली.

श्री.योगेश्वरी देवल कमिटीच्या माजी विश्वस्तांनी आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेतून सांगितले की, मा.धर्मादाय आयुक्त, लातूर यांच्या अदेशानुसार २०२४ साली मा.धर्मादाय आयुक्त, बीड यांनी शासनाच्या सर्व नियम व अटींच्या अधिन राहून दिनांक ०१/०७/२०२४ रोजी श्री.योगेश्वरी देवल कमिटीच्या नविन विश्वस्त मंडळाची निवड केली, सर्व नवनिर्वाचित विश्वस्त मंडळाच्या सदस्यांची दिनांक ०१/०७/२०२४ रोजी देवल कमिटीचे

▶ उर्वरित पान २ वर